आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

८ एप्रिल २०२४ - सोमवार

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानापूर्वी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. छाननीनंतर राज्यातल्या आठ मतदारसंघात २९९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्यात नांदेडमधे सर्वाधिक ६६ अर्ज वैध ठरले आहेत. अमरावतीमध्ये ५६, हिंगोलीत ४८, परभणीत ४१, वर्ध्यात २६, बुलडाण्यात २५, यवतमाळ-वाशिममध्ये २०, आणि अकोल्यात १७ अर्ज वैध आहेत.

परभणीतून अपक्ष बाळासाहेब उगले यांनी अर्ज मागे घेतला आहे.

**<><><><><><>**

देशाच्या विविध भागात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभा होत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची राज्यातली पहिली प्रचारसभा आज चंद्रपुरात महायुतीचे चंद्रपूरचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार तसंच गडचिरोली चिमूर मतदार संघाचे उमेदवार अशोक नेते यांच्यासाठी होत आहे. संध्याकाळी ५ वाजता प्रधानमंत्री या सभेला संबोधित करणार आहेत. या सभेच्या दृष्टीनं चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. विदर्भातल्या पाच मतदार संघात १९ एप्रिलला मतदान होणार आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीत राज्यातल्या ४८ पैकी ४८ जागा भाजपा महायुती मोठ्या मताधिक्यानं जिंकेल, असा विश्वास रिपाई अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला आहे. ते आज चंद्रपूर इथं बातमीदारांशी

बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ४०० पेक्षा जास्त जागा जिंकण्याचा संकल्प पूर्ण होईल, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वायव्य मुंबई लोकसभा मतदार संघातले उमेदवार अमोल किर्तीकर यांची आज ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाकडून चौकशी सुरू आहे. कोरोना काळातल्या कथित खिचडी घोटाळ्याप्रकरणी ईडीच्या मुंबई कार्यालयात ही चौकशी होत आहे.

बांधकाम व्यावसायिक युसूफ मोहम्मद लकड़ावाला आणि अन्य प्रकरणात आज सक्तवसुली संचालनालयाच्या मुंबईतल्या अधिकाऱ्यांनी लोणावळानजीक मावळ इथं एक कोटी ८१ लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. पीएमएलए अर्थात आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा २००२ च्या तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

**<><><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीत वाशीम जिल्ह्यातल्या मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मालेगाव तहसील कार्यालयानं काल एका लग्नसोहळ्यातही मतदार जनजागृती केली. या सोहळ्यासाठी जमलेल्या वऱ्हाडी मंडळींना मतदान करण्याची विनंती करून या कार्यालयानं काल मतदार जनजागृतीचा एक अनोखा उपक्रम राबवला. त्यासाठी मालेगाव तहसील कार्यालयाच्या निवडणूक विभागातल्या कर्मचाऱ्यांनी मंडपात विशिष्ट ठिकाणी सेल्फी पॉईंटची रचना केली होती.

**अमरावती** मध्येही जनजागृतीचे विविध प्रयत्न सुरु असून या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून अमरावतीतल्या मोर्शी रोडलगतच्या मैदानावर आज ५ हजार विद्यार्थी, नागरीक आणि युवा मतदारांची मानवी साखळी तयार करण्यात आली होती.

**नंदुरबार** जिह्यातल्या शहादा शहरात आज सकाळी मतदार जनजागृतीसाठी स्वीप कार्यक्रमा अंतर्गत मॅरेथॉन स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. शिक्षण विभागाने आयोजीत केलेल्या या मॅरेथॉन स्पर्धेत शिक्षक, शासकीय कर्मचाऱ्यांसह सामान्य नागरीकही सहभागी झाले होते.

**<><><><><>**

दिल्लीतल्या विशेष सीबीआय न्यायालयानं भारत राष्ट्र समितीच्या नेत्या के कविता यांना जामीन द्यायला नकार दिला. मुलाच्या परीक्षेसाठी कविता यांनी जामीनाची मागणी केली होती. जामीन मिळाला तर कविता पुरावे नष्ट करतील आणि साक्षीदारांना प्रभावित करतील असा दावा करत सक्तवसुली संचलनालयानं या जामीनाला विरोध केला. कविता ९ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडीत आहेत. १५ मार्च रोजी त्यांना अटक झाली होती.

**<><><><><>**

NCERT, अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेनं परिषदेच्या पाठ्यपुस्तकांच्या साहित्याची व्यावसायिक वापरासाठी प्रकाशित करणारी कोणतीही व्यक्ती किंवा संस्थेविरुद्ध स्वामित्त्व हक्क कायद्यांतर्गत कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. शैक्षणिक संस्थांनी अशी पाठ्यपुस्तकं किंवा कार्यपुस्तकं वापरू नये, त्यातला मजकूर चुकीचा असू शकतो. कोणत्याही व्यक्तीला अशी बनावट पाठ्यपुस्तकं किंवा कार्यपुस्तकं आढळली तर त्यांनी तात्काळ कळवण्याचं आवाहन परिषदेनं केलं आहे.

**<><><><><><>**

वसईचे माजी आमदार आणि जनता दलाचे ज्येष्ठ नेते डॉमनिक गोन्सालविस यांच्या पार्थिवावर आज सकाळी अंत्यसंस्कार झाले. वृद्धापकाळानं काल त्यांचं राहत्या घरी निधन झालं होतं.

//<><><><><><>//